नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३१० Issue - 310 | वार बुधवार दि. १ एप्रिल २०२६ Blow- Wednesday Date 1 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## रेडी रेकनर दर ‘जैसे थे’

### मुख्यमंत्री फडणवीस सरकारचा घर खरेदीदारांना दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नवीन घर घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या नागरिकांना राज्य सरकारने एक अत्यंत सुखद वार्ता दिली आहे. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी रेडी रेकनरच्या दरांमध्ये कोणतीही वाढ न करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. यामुळे १ एप्रिल २०२६ पासून लागू होणारे रेडी रेकनरचे दर ‘जैसे थे’ राहणार असून, सामान्यांच्या खिशावर पडणारा अतिरिक्त मुद्रांक शुल्काचा बोजा आता टळणार आहे.



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी याबाबत घोषणा केली. या निर्णयामुळे राज्याच्या विकासात महत्त्वाचा वाटा असलेल्या बांधकाम क्षेत्राला मोठी गती मिळणार असल्याचे ते म्हणाले. गेल्या काही वर्षांपासून जागतिक आर्थिक परिस्थिती आणि बांधकाम साहित्याच्या वाढलेल्या किमतींमुळे हे क्षेत्र आव्हानात्मक स्थितीतून जात आहे. या पार्श्वभूमीवर, क्रेडाईसह विविध संघटनांनी दर न वाढविण्याची विनंती शासनाकडे केली होती. जनहिताचा विचार करून शासनाने यंदा दरवाढीची टक्केवारी ‘निरंक’ ठेवली आहे.

या संदर्भात माहिती देताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मिळकतींचे वास्तव आणि बाजारातील सद्यस्थिती लक्षात घेऊनच हे बाजारमूल्य निश्चित करण्यात आले आहे. दस्त लेखनीक, विविध संघटनांच्या सूचना आणि हरकतींचा यथायोग्य विचार करून बांधकाम क्षेत्राला चालना देण्यासाठी आम्ही हे दर स्थिर ठेवले आहेत.

महसूल संकलनात विक्रमी वाढ : दर वाढविले नसले तरी राज्याच्या मुद्रांक शुल्क आणि नोंदणी विभागाने महसूल संकलनात विक्रमी झेप घेतली आहे. सन २०२५-२६ या सरत्या आर्थिक वर्षात ३० मार्च २०२६ पर्यंत राज्याच्या तिजोरीत तब्बल ६० हजार ५६८.९४ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. यापैकी सर्वाधिक ४९ हजार ५३४ कोटींचा वाटा ‘आय-सरिता’ प्रणालीचा आहे. सन २०२३-२४ मध्ये हा महसूल ५० हजार कोटींच्या आसपास होता, जो आता साठ हजार कोटींच्या पार गेला आहे. यावरून दस्त नोंदणीची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि गतिमान झाल्याचे स्पष्ट होत आहे.

दस्त नोंदणीत सुसूत्रता : दर स्थिर ठेवण्यासोबतच प्रशासनाने वार्षिक मूल्य दर तक्त्यांमध्ये तांत्रिक सुसूत्रता आणण्यावर भर दिला आहे. यामध्ये नवीन विकास योजनांची (डीपी) अंमलबजावणी, नवीन सर्व्हे नंबरची नोंद आणि गावांशी संबंधित तांत्रिक दुरुस्त्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे भविष्यात दस्त नोंदणी करताना नागरिकांना होणारा तांत्रिक त्रास कमी होणार असून ही प्रक्रिया अधिक वास्तववादी आणि सुलभ होणार आहे.

## राज्यात १० वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या




मुंबई : महाराष्ट्राच्या प्रशासनात महत्त्वपूर्ण फेरबदल करत राज्य सरकारने आज, मंगळवारी एकाचवेळी १० वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या जाहीर केल्या आहेत. या बदल्यांमध्ये विविध महत्त्वाच्या विभागांतील पदांवर नव्या नियुक्त्या करण्यात आल्या असून, प्रशासनात कार्यक्षमता वाढवण्याचा प्रयत्न दिसून येत आहे.

यामध्ये विशेष लक्षवेधी बदल म्हणजे अश्विनी भिडे यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती. त्या यापूर्वी मुख्यमंत्र्यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव पदावर कार्यरत होत्या. त्यांच्या जागी १९९३ बॅचचे वरिष्ठ अधिकारी लोकेश चंद्रा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चंद्रा यापूर्वी महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. दरम्यान, भिडे यांच्याकडे मुंबई मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार कायम ठेवण्यात आला आहे.

मागील सहा महिन्यांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि हिवाळी अधिवेशनामुळे प्रशासकीय बदल्या रखडल्या होत्या. मात्र मार्च अखेरीस या बदल्या अपेक्षित होत्या. त्यानुसार २८ मार्च रोजी काही बदल्या झाल्यानंतर आज मोठ्या प्रमाणावर फेरबदल जाहीर करण्यात आले.

प्रमुख बदल्या पुढीलप्रमाणे :- लोकेश चंद्रा (आयएएस १९९३ ) - मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव, मुंबई

अश्विनी भिडे (आयएएस १९९५ ) - आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका

विकास चंद्र रस्तोगी (आयएएस १९९५ ) - अतिरिक्त मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग., विनिता वैद सिंघल (आयएएस १९९६ ) - प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग

परिमल सिंग (आयएएस २००४ ) - सचिव (कृषी), कृषी व एडीएफ विभाग

तुकाराम मुंढे (आयएएस २००५ ) - सचिव, आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन विभाग., लहू माळी (आयएएस २००९ ) - व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वासन प्रकल्प लिमिटेड

माणिक गुरसाल (आयएएस २००९ ) - सचिव, दिव्यांग कल्याण विभाग

प्रेरणा देशभ्रतार (आयएएस २०१०) - आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग

पृथ्वीराज बी. पी. (आयएएस २०१४ ) - आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका

या बदल्यांमुळे राज्यातील विविध विभागांमध्ये नवे नेतृत्व निर्माण होणार असून, प्रशासन अधिक गतिमान होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## बिहारमधील नालंदामध्ये चेंगराचेंगरी, शीतला माता मंदिरात भीषण दुर्घटना; सहा भाविकांचा मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नालंदा : बिहारमधील नालंदा जिल्ह्यातून एक वाईट बातमी समोर आली आहे. आज मंगळवारी नालंदामधील शीतला माता अष्टमी मंदिरात प्रचंड गर्दीत चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत सहा भाविकांचा मृत्यू झाला, तर बरेच भाविक जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी बिहार शरीफ येथील मॉडेल रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याचं सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, चैत्र महिन्याचा आज शेवटचा मंगळवार असल्याने सकाळपासूनच मंदिरात भाविकांची मोठी गर्दी जमली होती. याच दरम्यान, अचानक कशाबद्दल तरी अफवा पसरली आणि काही वेळातच चेंगराचेंगरीची परिस्थिती निर्माण झाली. गर्दीमुळे अनेक लोक खाली पडले. या चेंगराचेंगरीत लोक एकमेकांवर चढू लागले. काही वेळाने, जेव्हा गर्दी नियंत्रणात आणली गेली, तेव्हा चेंगराचेंगरीत मरण पावलेल्यांचे मृतदेह बाहेर काढले. घटनास्थळावरून सहा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.

घटनेनंतर घटनास्थळी आरडाओरडा आणि गोंधळ सुरू झाला. स्थानिक नागरिक आणि प्रशासनाच्या मदतीने जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणण्यास सुरुवात केली. नालंदा पोलिसांच्या पथकाने या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. या प्रकरणी पुढील कारवाई सुरू आहे.

आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या नालंदा दौऱ्यामुळे तेथील प्रशासकीय यंत्रणा व्यस्त होती आणि याचदरम्यान ही मोठी घटना उघडकीस आली. घटनेनंतर लोक तासभर आपल्या नातेवाईकांचा शोध घेण्यात व्यस्त होते. बहुतेक लोक आपल्या कुटुंबासोबत आले होते, त्यामुळे मुलांची संख्याही जास्त होती.

महिला भाविकांचं म्हणणं आहे की, चैत्र महिन्याचा हा शेवटचा मंगळवार होता. येथे जत्रा भरली होती. लोकांची गर्दी खूप वाढली होती. लोक लवकर दर्शन घेण्यासाठी एकमेकांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न करत होते. कोणीही रांगेत उभे राहून पूजा करू इच्छित नव्हते. याच गडबडीत चेंगराचेंगरी झाली. मंदिराचं गर्भगृह खूप लहान आहे. मंदिरात गेलेल्या महिलेनं सांगितलं की, 'गर्दी इतकी होती की लोक एकमेकांवर चढत होते. सर्वांना पुढे जाऊन पूजा करण्याची घाई होती.

## भोंदू अशोक खरातची पत्नी कल्पना खरात फरार, फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर गायब

नाशिक : शेकडो महिलांचे लैंगिक शोषण केलेल्या अशोक खरात (हिड्ढ घहरीरीं) प्रकरणात आता आणखी एक ट्विस्ट आला आहे. अशोक खरातची पत्नी कल्पना खरात फरार झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. कल्पना खरात यांच्यावर आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर त्या फरार झाल्याची माहिती आहे. कल्पना खरातत्या अटकेसाठी दोन पथकं नाशिक आणि पुण्याच्या दिशेने रवाना झाल्याची सूत्रांनी माहिती दिली.

अशोक खरातसोबत आता त्याची पत्नी कल्पना खरात यांच्यावर शिर्डी पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर त्या फरार झाल्याची माहिती असून पोलिसही त्यांच्या मागावर आहेत.

फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस कारवाई करणार आणि अटक करणार असल्याची कुणकुण लागल्यानंतर कल्पना खरात फरार झाल्याची माहिती आहे.

शिर्डीतील ४ एकर भूखंड खरेदीप्रकरणी अशोक खरातसह ५ जणांवर गुन्हा दाखल झालाय. मूळ जमीन मालक रावसाहेब गोंदकर यांच्या फिर्यादीवरून हा गुन्हा दाखल झाला आहे. जमीन खरेदी व्यवहारात फसवणूक केल्याप्रकरणी अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात, शिर्डीतला मध्यस्थ अरविंद बावके, किरण सोनावणे, अशोक तांबे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

दरम्यान, शिर्डीमध्ये गुन्हा दाखल झाल्यावर खरातची पत्नी फरार झाल्याची माहिती आहे. अरविंद बावके आणि किरण सोनावणे यांना ताब्यात घेण्यात आलं आहे. फसवणूक आणि सावकारी अधिनियमांतर्गत शिर्डी पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे. कर्ज फेडण्यासाठी व्याजाने पैसे देत जमीन बळकावल्याचा आरोप आहे. शिर्डीत भोंदू खरातची कोट्यवधींची मालमत्ता आहे. या सर्व व्यवहारांची एसआयटी चौकशी करत आहे.

भोंदू खरात आणि त्याचे डोकं चक्रावणारे कारनामे सातत्यानं समोर येत असतानाच आता खरातचा नवा धक्कादायक बनाव समोर आला आहे. खरात ‘स्पॉट व्हिजिट’च्या नावाखाली मोठ्या प्रमाणात पैसे उकळत असल्याचं उघड झालं आहे. या भेटीसाठी खरात तब्बल ५ लाख ते २० लाखांपर्यंत फी उकळत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. लोकांच्या घरी, कार्यालयात किंवा व्यवसायाच्या ठिकाणी जाण्यासाठी तो महागड्या गाड्यांची मागणी करत असे. काही भक्तांकडून त्यानं अशाप्रकारे गाड्याही मिळवल्याचे समोर आलं आहे. अमावस्या आणि पौर्णिमेच्या दिवशी त्याच्याकडे भक्तांची मोठी गर्दी होत असे. जास्त पैसे देणाऱ्या भक्तांना तो प्राधान्य देत असल्याचेही एसआयटीच्या चौकशीत स्पष्ट झालं आहे.

### कमी दाबाचा पट्टा सक्रिय; अवकाळी पावसाने गहू, मका, आंबा जमीनदोस्त

## राज्यात अवकाळीचा तडाखा! गारपीट, विजांचा कडकडाट अन् वादळी पाऊस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : गेल्या २४ तासांपासून राज्यभरात वादळी वाऱ्यासह पाऊस आणि गारपीट होताना दिसतेय. पुन्हा एकदा अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली असून मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यांना याचा मोठा फटका बसत आहे. पुढील ४ दिवस राज्यभरात अवकाळी पाऊस आणि गारपीटीचे इशारे देण्यात आले आहेत. मराठवाडा, विदर्भसह मध्य महाराष्ट्रात हवामान विभागाचे हाय अलर्ट देण्यत आलेत. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यात सकाळपासून ढगाळ वातावरण असून विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वाऱ्याचा आणि काही ठिकाणी गारपिटीचाही इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने धाराशिवसह बीड आणि लातूर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

या सततच्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून तोंडचा घास हिरावल्याची भावना व्यक्त केली जात आहे. तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

कमी दाबाचा पट्टा सक्रिय

हवामान विभागाच्या माहितीनुसार, विदर्भ ते दक्षिण भारतापर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने राज्यभर पावसाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे पुढील काही दिवस राज्यात अवकाळी पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, धाराशिव जिल्ह्यात ताशी ५० ते ६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना आणि तुरळक ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज आहे.





प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत.

जळगाव जिल्ह्यात शेतीचे मोठे नुकसान

जळगाव जिल्ह्यातील अनेक भागांत पुन्हा एकदा वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली असून यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. मका, ज्वारी, बाजरी तसेच कांदा बियाणे पिकांना याचा मोठा फटका बसला आहे. गेल्या काही वर्षांपासून मार्च-एप्रिल या उन्हाळ्याच्या काळात जळगाव जिल्ह्यात अवकाळी पावसाचे प्रमाण वाढल्याचे पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, मागील पंधरवड्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. त्यावेळी काढणीसाठी तयार असलेल्या गहू आणि हरभरा पिकांचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीतून शेतकरी सावरत नाहीत तोच काल रात्री पुन्हा एकदा अवकाळी पावसाने धडक दिली. जळगाव, भुसावळ, एरंडोल, धरणगाव आणि मुक्ताईनगर तालुक्यांतील अनेक भागांत वादळी वाऱ्यासह पाऊस झाला, ज्यामुळे शेतीचे नुकसान अधिकच वाढले आहे. या पार्श्वभूमीवर, नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे.

नांदेड जिल्ह्यातही अवकाळीचा फटका

नांदेड जिल्ह्यात रात्रभर अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली असून जिल्ह्याला मोठा तडाखा बसला आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या या पावसामुळे गहू, ज्वारी, आंबा, मका तसेच काढून ठेवलेल्या हळदीसह विविध शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाले असून तोंडचा घास हिरावल्याची भावना ते व्यक्त करत आहेत. नांदेड, भोकर, अर्धापूर, उमरी, धर्माबाद आदी तालुक्यांना या अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला आहे. दरम्यान, अर्धापूर तालुक्यातील लहान गावात वीज पडून एका शेतकऱ्याची गाय दगावल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर, नुकसानग्रस्त भागांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

नाशिक, नगर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, बीड, परभणी, हिंगोली, जालना, संभाजीनगर, जळगाव जिल्ह्याला वादळी वाऱ्यासह पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आलाय. उर्वरित बहुतांश जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आलाय.

## संपादकीय....

### तोंडचा घास हिरावला

राज्यभरात वादळी वाऱ्यासह पाऊस आणि गारपीट होताना दिसतेय. पुन्हा एकदा अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली असून मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यांना याचा मोठा फटका बसत आहे. पुढील ४ दिवस राज्यभरात अवकाळी पाऊस आणि गारपीटीचे इशारे देण्यात आले आहेत. मराठवाडा, विदर्भसह मध्य महाराष्ट्रात हवामान विभागाचे हाय अलर्ट देण्य्त आलेत. दरम्यान, धाराशिव जिल्ह्यात सकाळपासून ढगाळ वातावरण असून विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वाऱ्याचा आणि काही ठिकाणी गारपिटीचाही इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने धाराशिवसह बीड आणि लातूर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या सततच्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून तोंडचा घास हिरावल्याची भावना व्यक्त केली जात आहे. तात्काळ पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार, विदर्भ ते दक्षिण भारतापर्यंत कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने राज्यभर पावसाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे पुढील काही दिवस राज्यात अवकाळी पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, धाराशिव जिल्ह्यात ताशी ५० ते ६० किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तसेच विजांच्या कडकडाटासह मेघगर्जना आणि तुरळक ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज आहे. प्रशासनाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत. जळगाव जिल्ह्यातील अनेक भागांत पुन्हा एकदा वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली असून यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. मका, ज्वारी, बाजरी तसेच कांदा बियाणे पिकांना याचा मोठा फटका बसला आहे. गेल्या काही वर्षांपासून मार्च-एप्रिल या उन्हाळ्याच्या काळात जळगाव जिल्ह्यात अवकाळी पावसाचे प्रमाण वाढल्याचे पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, मागील पंधरवड्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. त्यावेळी काढणीसाठी तयार असलेल्या गहू आणि हरभरा पिकांचे मोठे नुकसान झाले होते. या नुकसानीतून शेतकरी सावरत नाहीत तोच काल रात्री पुन्हा एकदा अवकाळी पावसाने धडक दिली. जळगाव, भुसावळ, एरंडोल, धरणगाव आणि मुक्ताईनगर तालुक्यांतील अनेक भागांत वादळी वाऱ्यासह पाऊस झाला, ज्यामुळे शेतीचे नुकसान अधिकच वाढले आहे. या पार्श्वभूमीवर, नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत आणि शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून जोर धरत आहे. नांदेड जिल्ह्यात रात्रभर अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली असून जिल्ह्याला मोठा तडाखा बसला आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या या पावसामुळे गहू, ज्वारी, आंबा, मका तसेच काढून ठेवलेल्या हळदीसह विविध शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाले आहे.

# आयुर्वेद विषयक संशोधन १३ भाषांमध्ये उपलब्ध होणार

## केंद्रीय आयुर्वेदशास्त्र संशोधन परिषद आणि अनुवादिनी एआय यांच्यात सामंजस्य करार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : आयुर्वेदाविषयीची तथ्ये आणि पुराव्यावर आधारित माहिती, कोणत्याही भाषिक अडथळ्यांशिवाय सर्वत्र पोहचवा या उद्देशाने आयुष मंत्रालयाच्या अखत्यारितील केंद्रीय आयुर्वेदशास्त्र संशोधन परिषदेने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अखत्यारीतील अनुवादिनी एआय या व्यासपीठासोबत एक सामंजस्य करार केला आहे. अनुवादिनी एआय हे व्यासपीठ अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विकसित केले आहे. संपूर्ण भारतभरात आयुर्वेदाविषयीच्या तथ्ये आणि पुराव्यावर आधारित ज्ञानाच्या सार्वत्रिक उपलब्धतेची व्याप्ती विस्तारणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या सामंजस्य करारांतर्गत, अनुवादिनी एआय ही यंत्रणा केंद्रीय आयुर्वेदशास्त्र संशोधन परिषदेची संशोधने आणि शैक्षणिक साहित्य हिंदीसह १३ प्रादेशिक भाषांमध्ये अनुवादित करण्याच्या प्रक्रियेत सहकार्य करणार आहे. यामुळे आयुर्वेदाविषयीचे तथ्ये आणि पुराव्यावर आधारीत ज्ञान देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचू शकेल.

केंद्रीय आयुर्वेदशास्त्र संशोधन परिषदेचे महासंचालक प्रा. वैद्य रबिनारायण आचार्य आणि अनुवादिनी एआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बुद्ध चंद्रशेखर यांनी या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. ही भाषांविषयक प्रगत तंत्रज्ञान आणि भारताच्या पारंपारिक वैद्यकीय ज्ञानाचे एकात्मिकरण घडवून आणणारी एक महत्वाची घडामोड ठरली आहे.

अनुवादिनी एआय अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाच्या आधारे, प्रामुख्याने तांत्रिक, वैज्ञानिक आणि प्रशासनाशी संबंधित ज्ञानाचे विविध भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये अनुवाद केला जातो. नागरिकांची भाषक किंवा प्रादेशिक पार्श्वभूमी काहीही असली तरी देखील त्यांना विश्वसार्ह आणि संशोधनावर आधारित माहिती उपलब्ध करणे हे या व्यासपीठाचे उद्दिष्ट आहे. देशभरातील २५ राज्यांमध्ये ३० संस्थांच्या माध्यमातून केंद्रीय आयुर्वेदशास्त्र संशोधन परिषदेचे जाळे विस्तारलेले आहे. परिषदेच्या या व्यापक व्यवस्थेअंतर्गत आयुर्वेदशास्त्राशी संबंधित विज्ञाननिष्ठ संशोधनांचे प्रकाशन केले जाते. त्याच अनुषंगाने परिषदेद्वारे इतर माहितीपर, शैक्षणिक आणि संवादात्मक साहित्यासोबतच केंद्रीय आयुर्वेदशास्त्र संशोधन परिषद बुलेटिन हे संशोधनविषयक एक प्रमुख त्रैमासिक नियतकालिक काढले जाते. सध्या हे सर्व साहित्य सध्या प्रामुख्याने इंग्रजीमध्ये प्रकाशित केले जाते. आता झालेल्या या सामंजस्य करारांतर्गत, अनुवादिनी एआय या सर्व संशोधनपर प्रकाशने आणि शैक्षणिक साहित्याचे १३ प्रादेशिक भाषांमध्ये भाषांतर करणार आहे. यामुळे आयुर्वेद विषयक मूळ ज्ञान मोठ्या व्यापक लोकसंख्येपर्यंत पोहचू शकणार आहे, परिणामी चुकीच्या माहिती पसरण्याचा धोकाही कमी होऊ शकणार आहे.

करार स्वाक्षरीनिमीत्त झालेल्या कार्याक्रमाला केंद्रीय आयुर्वेदशास्त्र संशोधन परिषदेचे महासंचालक प्रा. रबिनारायण आचार्य यांनी संबोधित केले. या सहकार्यातून केंद्रीय आयुर्वेदशास्त्र संशोधन परिषदेची वचनबद्धता दिसून येत असल्याची बाब त्यांनी नमूद केली. आयुर्वेद विषयक संशोधनाचे लाभ हे केवळ शैक्षणिक समुदायापुरते मर्यादीत न राहता, ते देशभरातील सर्व नागरिकांना त्यांच्या त्यांच्या भाषांमधून मिळायला हवेत यासाठी परिषद वचनबद्ध असल्याचेही त्यांनी सांगितले.

अनुवादिनी एआयचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बुद्ध चंद्रशेखर यांनीही उपस्थितांशी संवाद साधला. विशेषत: तंत्रज्ञानाच्या मदतीने समाजाला सुलभतेने - न्याय पद्धतीने आणि सक्षमीकरणाचे उद्दिष्ट साध्य केले जाईल अशा रितीने ज्ञान उपलब्ध होत राहील यासंबंधीच्या उपक्रमांना पाठबळ देण्यासाठीच हे व्यासपीठ विकसित केले असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

भविष्यात या उपक्रमाची व्याप्ती परदेशी भाषांपर्यंत विस्तारली जाण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने ज्या देशांमध्ये आयुष मंत्रालय आणि केंद्रीय आयुर्वेदशास्त्र संशोधन परिषदेने आयुष अध्यासनाची स्थापना केली आहे, त्या देशांमधील भाषांपासून या उपक्रमाची सुरुवात केली जाण्याची शक्यता आहे. यामुळे आयुर्वेदाविषयीच्या मूळ ज्ञानाची जागतिक उपलब्धताही वाढू शकणार आहे.

# रयत ऑलिंपियाड आणि आर टी एस परीक्षांमध्ये न्यू इंग्लिश स्कूल भाळवणीचे उज्वल यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भाळवणी/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील न्यू इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांनी रयत शिक्षण संस्थे मार्फत घेण्यात आलेल्या रयत प्रज्ञाशोध परीक्षा(ठढड) इयत्ता ७ वी आणि रयत ऑलिंपियाड इयत्ता ९ वी स्पर्धा परीक्षांचा निकाल जाहीर झाला असून या विद्यालयाचे खालील प्रमाणे ७ वी चे ५ विद्यार्थी मुलाखतीस पात्र आणि ९ वी चे ६ विद्यार्थी प्रकल्पास पत्र ठरले आहेत .

**आर टी एस विद्यार्थी** – देठे काव्या समाधान–१६४, शेवतकर जान्हवी मोहन–१५०, पुसावळे श्रेया नवनाथ–१३८,शेरकर आर्या सचिन १३६,नागणे अर्णव अतुल–१३२ तसेच देठे संध्या संपत – १३० ही विद्यार्थीनी फक्त एक प्रश्नाने मेरिट लिस्ट मधून वंचित राहिली.

विभाग प्रमुख –दिपक माने विषय तज्ञ योगेश जाधव , सुवर्णा लिंगे श्रीम. माधवी भोसले, अनिल मोहिते व युवराज नारनवर या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.

**रयत ऑलिंपियाड पात्र विद्यार्थी** – गौरी मासाळ –८४.८५, सायली यलमर –७८.७९, वैष्णवी माळी–७६.७७, श्रेया हातगिने–७५.७६, साक्षी शिंदे– ७४.७५, साक्षी ऐवळे– ७३.७४ या विद्यार्थ्यांनी हे संपादन केले.

विभाग प्रमुख सारिका कदम, विषय तज्ञ उमादेवी नागटिळक, समाधान सपाटे , गणेश अवघडे, वैशाली पवार या सर्वांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थी, विभाग प्रमुख, मार्गदर्शक शिक्षक तसेच मुख्याध्यापक शिंदे कचरनाथ ज्ञानदेव, उपमुख्याध्यापिका मोरे प्रतिभा रमेशराव, पर्यवेक्षक बेसिकराव गौरीशंकर, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालक सर्वांचे मध्य विभागाचे चेअरमन संजीव पाटील, सहसचिव माध्यमिक विभाग पवार बी एन, विभागीय अधिकारी जगदाळे, सहाय्यक विभागीय अधिकारी दाभाडे ,स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन संभाजी शिंदे, सदस्य वामन सराटे - पाटील, सरपंच रणजीत जाधव, उपसरपंच नितीन शिंदे, हभप रामदास चौगुले महाराज, ग्राहक पंचायतचे प्रशांत मळवदे, तसेच शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक संघ, आणि पालक शिक्षक संघ यांनी अभिनंदन केले आहे.

रयत शिक्षण संस्थेमधील आरटीएस शिष्यवृत्तीधारक पहिल्या १५० विद्यार्थ्यांना ८ वी आणि ९ वी या दोन वर्षासाठी दरवर्षी २००० रुपये ची लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शिष्यवृत्ती व प्रशस्तीपत्र देण्यात येते तसेच रयत ओलिंपियाड शिष्यवृत्तीसाठी पहिल्या ५० विद्यार्थ्यांना कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत ३००० रुपयांची शिष्यवृत्ती व प्रशस्तीपत्र प्राप्त होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भर्तरी विधाते यांनी केले आणि शेवटी आभार प्रदर्शन पालक राहुल हातगिने यांनी केले. यावेळी विद्यार्थी पालक शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कळंब डेपो येथे जयंती उत्सव कमिटीच्या अध्यक्षपदी राजकन्या गवळी (निंबाळकर) यांची तर उपाध्यक्ष म्हणून वंदना पालके.यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : दि. ३० मार्च रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सवाचे नियोजन करण्यासाठी रा. प. कळंब आगार दत्त मंदिर येथे मिटिंग घेण्यात आली सदरील मिटिंग मध्ये मोठ्या प्रमाणात महिला कर्मचारी व आगारातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रस्तावना श्री रविकांत शिंदे यांनी केली.जयंती उत्सव कमिटी पुढील प्रमाणे अध्यक्ष :- सौ.राजकन्या गवळी



(निंबाळकर), यांची सर्वानुमते निवड करण्यात आली उपाध्यक्ष पदी वंदना पालके,सचिव सौ. संध्या सोनटक्के, कोषाध्यक्ष सौ. सरोजा औसेकर,व सौ. निवेदिता रणदिवे, प्रसिद्धी प्रमुख म्हणून सौ प्रियंका शिंदे व सौ. अनुराधा भोसले, यांची निवड करण्यात आली.

त्यावेळी प्रकाश पटेकर, रविकांत शिंदे, नितीन गायकवाड,प्रशांत गायकवाड, अंकुश गायकवाड, संघरक्षित गायकवाड, बिभीषण क्षीरसागर, विलास थोरात, अशोक रणदिवे, विश्वनाथ गव्हाळे, आर. वाय. नकाते, एस. एस. कानडे, एस. आर. जाधव, सुनील जगताप, सुबोध रणदिवे, श्याम बनसोडे,एस. बी. पठाण, डी. सी. सरवदे, व इतर कर्मचारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# लोकमंगल साहित्य पुरस्काराचे वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : लोकमंगल फाउंडेशन च्या वतीने आयोजित लोकमंगल साहित्य पुरस्कार प्रदान सोहळ्यास उपस्थित राहून पुस्तकाचे वितरण केले सन्मानार्थचे अभिनंदन केले.

गेले बारा वर्षे लोक मंगल तर्फे राज्यस्तरीय या पुरस्कार वितरण सोहळ्याचे अत्यंत दिमाखात आयोजन केले जाते.

श्री हिराचंद नेमचंद वाचनालय हा सोहळा महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री श्री आशिष शेलार आणि कवयित्री व दूरचित्रवाणी कलावंत मा मधुराणी प्रभुलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

राज्यातील साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मंडळींना त्यांच्या कार्यास प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या यशाच्या सन्मान




व्हावा, हा या पुरस्कारा मागचा प्रमुख उद्देश आहे या पुरस्कारातून प्रेरणा घेऊन समानार्थी अधिक जोमाने काम करतील तसेच इतरांनीही यापासून प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला गेला.

या सोहळ्यात श्री ज्ञानेश्वर जाधव, श्री जितेंद्र सोनगिरे, श्री मयुरेश कुलकर्णी, श्री चित्रा पालेकर, श्री प्रेषित सिद्ध भट्टी, श्री प्रसाद कुमठेकर, यांना पुरस्कार प्रदान करून शुभेच्छा दिल्या. यावेळी उपमहापौर श्री न्यानेश्वर देवकर, अभिनेत्री मधुराना गोखले व इतर मान्यवर उपस्थित होते.

# गोविंदपुर येथे शिक्षक बन्सी शेळके यांचा सेवापुर्ती सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

खामसवाडी प्रतिनिधी/हनुमंत पाटुळे : कळंब तालुक्यातील गोविंदपूर येथील सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.श्री. बन्सी हरिभाऊ शेळके हे नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झाले. संस्थेच्या व शाळेच्या वतीने त्याचा सेवापुर्ती सत्कार सोहळा तथा निरोप समारंभ शाळेच्या प्रांगणात मोठ्या जनसमुदयाच्या उपस्थित पार पडला.




विद्यावर्धिनी शिक्षक प्रसारक मंडळ संस्थेचे सचिव वैभव मुंडे व मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस व्ही.जी. पवार यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविले. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षक संघाचे आमदार विक्रम काळे, बाळासाहेब घाडगे पाटील हे उपस्थित होते.

तर प्रमुख उपस्थितीमध्ये पंचायत समिती कळंब चे गटशिक्षण अधिकारी काळमाते, कळंबचे विस्तार अधिकारी फुलारी, धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, कळंब चे विस्तार अधिकारी संतोष माळी,अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला धाराशिव चे अध्यक्ष डॉ.गिरीष कुलकर्णी हे होते.

सेवापूर्ती सोहळ्याच्या निमित्ताने शुभेच्छा देताना मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यात सर्व मंचावरील मान्यवर शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांचा सहभाग होता. यावेळी उपस्थित विद्यार्थी भाऊक झालेली दिसले.

सत्काराला उत्तर देताना सत्कारमूर्ती बन्सी शेळके यांनी आपल्या(३५) वर्षांचा प्रदिर्घ यशस्वी कारकीर्दीचा लेखाजोखा आपल्या मनोगतातून मांडला.

यावेळी विस्ताराधिकारी मुळे मॅडम, जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा गोविंदपूर चे केंद्रप्रमुख कणकवाड, राजेश मुंडे, आविनाश मुंडे,विद्या विकास विद्यालय निपाणी येथील मुख्याध्यापक पाटील, जगदंबा विद्यालय खामसवाडी च्या मुख्याध्यापिका मंदाकिनी सावंत, हनुमान विद्यालय घारगाव चे मुख्याध्यापक व्ही.जी. जाधवर,संभाजी विद्यालय मंगरूळ चे मुख्याध्यापक सुभाष वाघमारे ,सत्कार मूर्तींचे गुरु ताकतोडे, राजीव गांधी विद्यालय बोरगावचे मुख्याध्यापक कांबळे, माजी शिक्षक श्रीमंत पाटील, सुनील पाटील, आर. व्ही.खोसे, शिंदे महाराज, तानाजी मालुसरे, बाळासाहेब सावंत, भीमराव सावंत जयभवानी विद्यालय गौरगाव, शिंदे बिभीषण,रमेश शेळके हायकोर्ट छत्रपती संभाजीनगर, डॉ. सखाराम गर्जे, अरुण सोनार, पत्रकार शिवाजी बोबडे, पत्रकार हनुमंत पाटुळे, संजय जगताप मुख्याध्यापक विद्याभवन हायस्कूल कळंब, दिगंबर शेळके, किशोर शेळके, चंद्रकांत शेळके, महादेव शेळके, बाबासाहेब पाटील, पि.यू. शिंदे, सायसराव सुतार, गोपीनाथ मुंडे,विश्वास केंगार, अण्णासाहेब सौदागर, गुलाब मुंडे, प्रदीप घोगरे, मारुती लाटे, विकास गुजर, अमोल माळी, भगवान घबाडे, सरपंच आशोक मस्के, उपसरपंच संतोष मुंडे, लालासाहेब माळी, अकुंश मुंडे,महेश गुजर, बलभिम बोंदर माजी शिक्षक, उत्रेश्वर मनकुदळे, सचिन कुंभार यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक हिरालाल मुंडे,सावंत बी.व्ही.,अकुंश हिंगे,राऊत, गायकवाड,बालाजी सुरवसे, शिक्षीका सौ.नयना केंगार,सेविका सुरेखा मस्के,आर्चना जाधव, यांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय देवधानोरा चे प्राचार्य गपाट यांनी केले.तर आभार शाळेचे शिक्षक हिरालाल मुंडे यांनी मांनले.

यावेळी बन्सी शेळके सरांचा पूर्ण परिवार, नातेवाईक, हितचिंतक, शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर,आजी- माजी विद्यार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट . सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

**प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर-सातारा रस्त्यावरील अर्धवट कामे पूर्ण करा

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी घेतली अधिकारी व महामंडळातील अधिकाऱ्यांची बैठक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज सातारा जिल्हाधिकारी कार्यालय येथे लातूर व सातारा ते पंढरपूर मार्गे विषयी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा परिषद सदस्य श्री सिद्धनाथ नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन अरुण गोरे (आबा) सातारा जिल्हा भाजपचे निवडणूक प्रभारी दहशिल दादा कदम, सातारा जिल्हा परिषद सदस्य ऋषिकेश धायगुडे पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अधिकारी अभियंता श्रीपाद जाधव, रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता आणि अधिकारी उपस्थित होते.

राष्ट्रीय महामार्ग ५४८ सी आणि ५४८ सातारा ते लातूर आणि सातारा ते पंढरपूर या रस्त्याच्या सातारा जिल्ह्यातील अनेक ठिकाणच्या अपूर्ण कामाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत माण तालुक्यातील धुळदेवासह गोंदवले दिवड पळशी चिमणगाव येथील अपघाताचे ब्लॉक स्पोर्ट्स अधोरेखित करून त्वरित अपूर्ण कामे पूर्ण करण्यासंदर्भात रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना अल्टिमेटम दिला.

सातारा पंढरपूर लातूर राष्ट्रीय महामार्गाचे सातारा जिल्ह्यातील काम अनेक ठिकाणी अपूर्ण असल्याने असंख्य अपघात होत आहेत अपघातात अनेकांना जीव गमावा लागला आहे नुकत्याच धुळदेव येथे भीषण अपघात होऊन दोन जणांचा मृत्यू झाला होता आतापर्यंत ५० पेक्षा जास्त लोकांचे मृत्यू झाले आहेत. ते निदर्शनास आणून दिले आहे. देवडी गावच्या हद्दीतील पुलाचे अर्धवट काम पूर्ण होईपर्यंत डांबरीकरणाच्या सूचना दिल्या. पंढरपूर तालुक्यातील उपरी येथील ५० मीटर लांबीचा आपण रस्ता पूर्ण करण्यास सांगितले आहे. अनेकदा आंदोलन करून प्रशासनाला याचा जाब विचारला आहे. मात्र प्रशासनाने त्याची फक्त बोलूनच केल्याने अपघाताची मालिका येथे आजही सुरू असून आजवर जवळपास २० जणांचा या ठिकाणी अपघात जीव गमवायचा लागला आहे या आजवर जवळपास ३०० हून अधिक छोटे-मोठे अपघात या ठिकाणी झाले असून आणखी किती जणांचा जीव घेण्याच्या प्रशासनाला या रस्त्या कामी जाग येणार असा संतप्त सवाल दुर्दैव ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या मतदारसंघातील हा रस्ता आहे आणि विशेष म्हणजे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे याच रस्त्यावरून सोलापूरकडे जिल्ह्यात येत जात आहेत तसेच या रस्त्यावर अनेक ठिकाणी लहान लहान मुलाचे बांधकाम केले नाही त्यामुळे वाहन चालवण्यासाठी चालकांना कसरत करावी लागत आहे पंढरपूर तालुक्यातील उपरी येथील पुलाचे बांधकाम गेले अनेक वर्ष सुरू आहे पण पूल मात्र चालू होत नाही तरी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी रस्त्याबाबत लक्ष देऊन हा प्रश्न तात्काळ सोडवावा अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

## स्वेरीतील प्राध्यापकांची पुण्याच्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटला भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)च्या चार प्राध्यापकांनी दि. १७ मार्च २०२६ रोजी पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचा अभ्यास दौरा केला. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आवश्यक तांत्रिक कौशल्ये व करिअर संधीच्या अनुषंगाने या भेटीचे आयोजन करण्यात आले होते.




साखर उद्योगात वापरल्या जाणाऱ्या प्रचलित पद्धती आणि तांत्रिक बाबी याबाबत व्यावहारीक अंतरदृष्टी मिळवणे हा या अभ्यास दौऱ्याचा उद्देश होता. पुण्यातील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट ही जगातील एकमेव संस्था अशी आहे की, ज्यामध्ये साखर उद्योगाशी संबंधित सर्व, वैज्ञानिक, तांत्रिक आणि शैक्षणिक कार्य हे एकाच छताखाली चालते. ही संस्था साखर उद्योगाच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील असून उद्दिष्ट प्राप्तीसाठी शैक्षणिक विस्तार, संशोधन आणि विकास या तीन मुख्य बाबींवर काम करते. यामुळे या दौऱ्या दरम्यान झालेला अभ्यास हा अभियांत्रिकीतील विद्यार्थ्यांसाठी खूप उपयोगी पडणार आहे. शुगर टेक्नॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. कार्कला गंगाधरम आणि वरिष्ठ शुगर अभियंता डॉ. आण्णासाहेब कोटकर व राजेंद्र भुईटे व सहकार्यांनी स्वेरीतून आलेल्या सर्व प्राध्यापकांचे स्वागत केले. यामध्ये प्राध्यापकांनी त्यांच्याकडून महत्वाच्या बाबी जाणून घेतल्या यामध्ये उसाच्या प्रसंस्करणातील कार्यक्षमता सुधारणे, उत्पादनाच्या नाविन्यपूर्ण अनुप्रयोगावर लक्ष केंद्रित करणे, साखर उत्पादन, कचरा व्यवस्थापन, जल व्यवस्थापन, विद्युत ऊर्जा जतन करण्याच्या संधी या मुख्य क्षेत्रांचा अभ्यास केला. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांचा सहकार्याने आणि उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजलेल्या या अभ्यास दौऱ्यात स्वेरीच्या इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख डॉ. चित्रसेन मैतई, संशोधन विभागाचे अधिष्ठाता डॉ.एम. एस. अभिषेक, डॉ. मृणाल कांती रजक, सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातील डॉ. आदित्य कुमार अंशू आदी प्राध्यापकांनी या अभ्यास दौऱ्यात सहभाग घेतला.

## विंचूर येथे नारळाच्या झाडावर चक्क वीज कोसळली, निसर्गाचा थरार! दक्षिण सोलापुरात विजेच्या कडकाटासह अवकाळीचा तडाखा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील विंचूर परिसरात निसर्गाचे रौद्ररूप पाहायला मिळाले. भर उन्हाळ्यात आलेल्या अवकाळी पावसाने विजेच्या कडखाटासह हजेरी लावली आणि विंचूर शिवारातील एका नारळाच्या झाडावर थेट वीज कोसळली. व या घटनेचा थरार कॅमेरात कैद झाला असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. गेल्या काही दिवसापासून सोलापूर जिल्ह्यात वातावरणात बदल जाणवत आहे. विंचूर शंकर नगर आणि आसपासच्या परिसरात विजांच्या कडकडासह जोरदार पाऊस सुरू झाला. याच दरम्यान विंचूर शिवारातील गुरव वस्ती खंदारे वस्ती या भागात असलेल्या एक उंच नारळाच्या झाडावर अचानक वीज पडली. वीज कोसळतात मोठा आवाज झाला, त्यामुळे परिसरात नागरिक भयभीत झाली वीज पडल्याने झाडाचे मोठे नुकसान झाले असले, तरी सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नाही वस्तीवरील नागरिक वेळी सुरक्षित ठिकाणी असल्याने मोठा आनंद टाळला आहे. या थरारक घटनेची लाईव्ह चित्रीकरण कॅमेरात कैद झाली आहेत.



तसेच मुंद्रून परिसरातील आज अवकाळी पावसाने जोरदार सुरुवात करत नागरिकांना अक्षरशः धक्का दिला, याच दरम्यान मुद्रुप येथील विठाई नगर परिसरात विजेची तार तुटून एका घरावर कोसळण्याची घटना घडली दुर्दैवाने या घटनेत कोणतीही जीवित हानी झालेली नाही, घराचे पत्र्यावर पडल्याने नागरिकांची भीतीचे वातावरण पसरला आहे. नागरिकांनी तात्काळ वीज वितरण कंपनीला माहिती दिली असून संबंधित यंत्रणा घटनास्थळी दाखल होण्याची अपेक्षा आहे. परिसरातील नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आव्हान करण्यात आले आहे.

अवकाळी पावसामुळे शेती पिकांनाही फटका बसण्याची शक्यता असून शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे दक्षिण सोलापूर मंद्रूप कुसुर निम्बर्गी परिसरातील ज्वारी गहू आणि द्राक्ष बागांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे व सोसायटीच्या वाऱ्यामुळे द्राक्ष बागा म्हणून पडले असून आंब्याचा मोहोरी मोठ्या प्रमाणावर गळून पडला आहे दक्षिण तालुक्यातील या भागात आहेरवाडी सिंदखेड, राजुर ,औराद, बिरनाळ, हत्तुर, वनमुर्गी ,वडकबाळ, १३ मेल, कारकल, माळकवटे ,काही बहाद विजेच्या कडखटासह पाऊस झाला वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी पिकाचे नुकसान झाले आहे झाल्याने नुकसानीची भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्याकडून व्यक्त होत आहे.

## वीर भारत तरुण मंडळातर्फे साईबाबा जयंती भक्तीभावात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : ोलापूरच्या अशोक चौक येथील वीर भारत क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्यावतीने सालाबादप्रमाणे यंदाही श्रीराम नवमीनिमित्त श्री साईबाबा जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली.

महापौर श्री.विनायकजी कोंड्याल, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार दशरथ वडतीले यांच्या हस्ते साईबाबांच्या मूर्तीचे पूजन करून महाआरती करण्यात आली. त्यानंतर जय मातााजी मंडळाचे आधारस्तंभ दिनेश घोडके, संतोष घोडके, सामाजिक कार्यकर्ते श्री. सूर्यकांतजी गोडाळे सौ.सुनीता गोडाळे, मी वडार महाराष्ट्राचा महिला संघटनेच्या शहराध्यक्षा ज्योती चौगुले व सोलापूर जनता बँकेच्या अधिकारी सौ.संगीता वडतिले यांच्या हस्ते मंडळाच्यावतीने महाप्रसाद वाटप करण्यात आला.त्याचा त्या परिसरातील शेकडो भाविकांनी लाभ घेतला.महाआरतीनंतर कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतिशबाजी करण्यात आली. तेथे आकर्षक, सुबक रंगीबेरंगी रांगोळी काढण्यात आली होती. त्यामुळे संपूर्ण परिसर प्रभू रामचंद्रमय व साईमय झाला होता.

मंडळाचे प्रमुख श्री. नागेशजी चौगुले यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.



याप्रसंगी सोलापूरचे महापौर विनायक कोंड्याल यांनी वीर भारत तरुण मंडळाचे पूजेला बोलल्याबद्दल आभार मानले व मंडळास सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर ज्योती चौगुले यांनी, मंडळाच्यावतीने विविध उपक्रम तसेच गेल्या १५ वर्षापासून रामनवमीनिमित्त महाप्रसाद वाटप केले जाते असे सांगितले.

मंडळाच्या स्तुत्य उपक्रमाबद्दल पत्रकार वडतीले यांनी समाधान व्यक्त केले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन प्रीती देवरमणी,गोविंद बंदपट्टे, कार्तिक चौगुले, गणेश लिंबोळे, नामदेव बंदपट्टे केतन चौगुले, समर्थ चौगुले, नागेश चौगुले आदींनी केले.

### ४१ गुन्ह्यातील ५८ दुचाकी केल्या जप्त

## भिवंडीत वाहन चोरीतील त्रिकुटाच्या गुन्हे शाखेने आवळल्या मुसक्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी गुन्हे शाखेच्या पथकाने वाहन चोरी करणाऱ्या त्रिकुटाच्या मुसक्या आवळल्या असून आरोपींकडून ४१ गुन्ह्यांतील चोरी केलेली ५८ दुचाकी जप्त करण्यात यश मिळवले आहे.विशेष म्हणजे चोरी केलेली सर्व वाहने महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये विक्री करून त्यांनी आपला आर्थिक फायदा केला होता, अशी माहिती गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी भिवंडी गुन्हे शाखा येथे सोमवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे.

गुन्हे शाखेतील पोलीस हवालदार साबीर शेख यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे सहाय्यक पोलिस आयुक्त शेखर बागडे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक श्रीराज माळी, मिथुन भोईर, पोलिस उपनिरीक्षक रवींद्र पाटील,रामचंद्र जाधव,राजेश शिंदे, पोलिस कर्मचारी सुधाकर चौधरी, सुनिल साळुंखे,निलेश बोरसे,सुदेश घाग, प्रशांत राणे,प्रकाश पाटील,शशिकांत यादव, राजेश गावडे, वसंत चौरे,रंगनाथ पाटील,वामन भोईर,किशोर थोरात,शिवाजी मुर्तडक,अमोल इंगळे,विजय कुंभार,भावेश घरत, नितीन नंदीवाले,सर्फराज तडवी,संजय चव्हाण,रविंद्र साळुंखे,माया डोंगरे,अनुष्का पाटील,दक्षता सुतार,सायली गंभेरा यांच्या पथकाने गणेश उर्फ गणु राजु मोरे वय २१ वर्षे, रा.खोणी गाव, डोंबिवली,साहेब अली उर्फ छोटु सुलतान अली शेख वय १९ वर्षे, रा.कामतघर, व सुनिल उर्फ बाळा शंकर राठोड वय २० वर्षे, रा. टेमघर, भिवंडी या तिघांना सापळा रचुन शिताफीने अटक केली.त्यांच्याकडे केलेल्या तपासात आरोपीकडुन १० लाख ६० हजार रुपये किमतीच्या ५८ दुचाकी जप्त करीत ४१ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

साहेबअली उर्फ छोटु सुलतान अली हा दुचाकी दुरुस्ती करणारा गॅरेज मध्ये काम करणारा असल्याने त्याने आपल्या कौशल्याने अनेक वाहन चोरी केल्यानंतर आर्थिक फायद्यासाठी गणेश व सुनिल यांनी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये या चोरीच्या दुचाकींची विक्री केली होती अशी माहिती पोलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी यावेळी दिली आहे.

## राष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला द्वितीय पारितोषिक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशन व राजस्थान टेनिस क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ९वी सिनियर राष्ट्रीय टेनिस क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा जयपूर येथील श्री बालाजी क्रिकेट मैदान, जयपूर, राजस्थान येथे उत्साह संपन्न झाली.




त्यामध्ये प्रथम क्रमांक उत्तर प्रदेश(यु.पी) द्वितीय क्रमांक महाराष्ट्र,तृतीय क्रमांक झारखंड चतुर्थ क्रमांक राजस्थान यांनी मिळवला.

या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट फेडरेशनचे अध्यक्ष कन्हैया गुज्जर तसेच भारतीय टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महासचिव सौ मीनाक्षी गिरी, महाराष्ट्र टेनिस क्रिकेट असोसिएशनच्या महिला अध्यक्ष धनश्री गिरी, इत्यादी उपस्थित होते.

या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये एकूण १२ संघांनी सहभाग नोंदवला टेनिस क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना महाराष्ट्र विरुद्ध उत्तर प्रदेश(यूपी) असा झाला. यामध्ये उत्तर प्रदेश(यूपी) च्या खेळाडूंनी लक्षवेधक कामगिरी करत विजेतेपद मिळवले. महाराष्ट्र संघाने चांगले प्रयत्न करून या अंतिम सामन्यात चांगली चुरस निर्माण करून उपविजेता ठरला तृतीय क्रमांक झारखंड ,चतुर्थ क्रमांक राजस्थानला मिळाला.

महाराष्ट्र संघाकडून कप्तान दर्शन थोरात, मानस पाटील, देवा सोनवणे, नारायण जंगम, साहिल शिरसाट, डॉ. गजानन जाधव (वैद्यकीय अधिकारी), कुणाल जाधव (आरोग्य सेवक), अंकुर हुमरे अन्वर पठाण, अभय चव्हाण ,विकास मस्के (शिक्षक), सोमा बिरादार ,इंद्रजीत कांबळे ,शुभम जंगम, संकेत डोंगरे ,सत्यम पांडे यांनी चांगली कामगिरी केली व महाराष्ट्र संघाला उपविजेतेपद मिळाले

या स्पर्धेतून उत्कृष्ट खेळाडू याची आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे या स्पर्धेतून ज्या खेळाडूंची निवड होणार आहे ते खेळाडू भारतीय संघाचे नेतृत्व करणार आहे . आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट स्पर्धा या डिसेंबर महिन्यामध्ये नेपाळ येथे होणार आहे.

महाराष्ट्र संघाला उपविजयतेपद मिळाल्याबद्दल आंतरराष्ट्रीय टेनिस क्रिकेट फेडरेशनचे अध्यक्ष कन्हैया गुज्जर व भारतीय व महाराष्ट्र टेनिस क्रिकेटच्या महासचिव मीनाक्षी गिरी, वूमन डायरेक्टर धनश्री गिरी, महाराष्ट्र उपाध्यक्ष विलास गिरी, चंद्रकांत तोरणे महाराष्ट्र सहसचिव, व नाशिक जिल्हा सचिव विलास गायकवाड या सर्वांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

तसेच संघाच्या विजयासाठी मार्गदर्शक म्हणून धनंजय लोखंडे, संदीप पाटील या सर्वांनी परिश्रम घेतले.

# महावितरण कंपनीचा भोंगळ कारभार; पूर्वसूचना न देताच वीज कनेक्शन कट करणे चालू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब येथे सध्या मार्च अखेर च्या नावाखाली एमएसईबी कंपणी ग्राहकांना विनाकारण त्रास देणे सुरू आहे कुठलीही पूर्वसूचना न देता डायरेक्ट लाईट कनेक्शन कट केले जात आहे त्यामुळे ग्राहकांना खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



कळंब शहरात तथा आजूबाजूतील अनेक गावांमध्ये सध्या महावितरण कंपनीचा भोंगळ कारभार सुरू असलेला दिसून येत आहे. कलम ५६ क्र नुसार कोणत्याही वीज ग्राहकाचे लाईट कनेक्शन कट करण्याच्या अगोदर पंधरा दिवस अगोदर मोबाईल एसएमएस द्वारे किंवा लेखी नोटीसद्वारे वीज खंडित करण्यात येईल असा संदेश ग्राहकापर्यंत पोहोचवणे अनिवार्य असताना देखील कळंब महावितरण कंपनी कुठल्याही ग्राहकांना पूर्व सूचना न देता सध्या लाईट कनेक्शन कट करण्याचा सपाटा सुरू आहे तसेच ज्या ग्राहकांना मोबाईल कळत नाही त्यांनी काय करावे व ते खूप लांबून महावितरण कंपनीच्या दारात बिल भरण्यासाठी जात असताना महावितरण कंपनीचे बिल भरणा केंद्र बंद असल्याचे दिसून येत आहे. एकीकडे महागाई ने सर्वसामान्य माणूस घोरपडत आहे.

शेतातील उत्पन्नाला भाव येत नाही नैसर्गिक आपत्तींना संकटाच्या पाठीमागून संकट येत आहेत त्याच अनुषंगाने महाराष्ट्र राज्य सरकारने शेतकऱ्यांची दोन लाखाचे कर्ज माफी केली आणि एकीकडे अशा खाजगी महावितरण कंपन्या सर्वसामान्य माणसांच्या वसुलीच्या तगादा लावत डायरेक्ट लाईट कनेक्शन कट करत आहेत.

आता ऑनलाईन मीटर आलेले आहेत त्यांची वसुली ऑनलाईन पद्धतीने करण्यात येईल पण ज्या गोरगरीब मजरानकडे स्मार्ट फोनच नाही त्यांनी काय करायचं त्यांनी फक्त महावितरण कंपणी च्या चकरा मारायच्या बास झाले आता महावितरण कंपनी जाहीर निषेध करत किती उलट सुलट महावितरण कंपनीच्या संदर्भात चर्चा सुरू असलेली दिसून येत आहे. तसेच ठिकठिकाणी गल्ली बोळामध्ये चौरस्ता मध्ये लाईटच्या तारा ही खाली आल्या मुळे वाहनांना खूप त्रास सहन करावा लागत आहे आणि याचा धोका निर्माण होऊ शकतो हे काम सुद्धा वारंवार तक्रार देऊनही महावितरण कंपनी पूर्ण करत नाही त्याबद्दल देखील चर्चा गुलदस्ता मध्ये आहे. तसेच कळम शहरातील नगरपालिका याचा वीज भरणा किती थकीत आहे आणि सर्वसामान्याला पाणीपुरवठा बंद झालेला दिसून येत आहे वीज खंडित केल्यामुळे.

**सहाय्यक अभियंता यांना वीज ग्राहक कळंब शहरांमध्ये किती आहेत ते विचारणा केली असता त्यांना माहीत नाही तसेच स्मार्ट का मीटर तुम्ही शहरांमध्ये किती ठिकाणी बसवलेले आहेत ते सुद्धा त्यांना आकडेवारी माहित नाही त्यांनी सांगितले.**

## विज ग्राहक

**सध्या स्मार्ट मीटर बसवणे चालू आहे त्याच अनुषंगाने बत्ती गुल फिल्म प्रमाणे शासनाने महावितरण कंपनीला निर्णय जारी करावा युनिट प्रमाणे बिल आकारण्यात यावे इतर चार्जेस त्या बिलामध्ये देऊ नये कारण ज्याप्रमाणे स्मार्टफोन किंवा टीव्ही रिचार्ज आपण करतात त्याचप्रमाणे महावितरण कंपनी आता बिल आकारणी करत आहे म्हणून इतर चार्जेस बिलामध्ये लावु नये.**

# पंढरपूर शहर पोलिसांची गांजा वाहतुकीवर मोठी कारवाई

## ४ किलो गांजा सह सहा लाखांचा मुद्देमाल जप्त






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

दिनांक २९ /३ /२०२६ रोजी चैत्र वारीचा बंदोबस्त च्या अनुषंगाने पंढरपूर शहरातील केबीपी येथे वाहतूक महिला पोलिस अंमलदार२१७१/गायकवाड वाहतुकाचे नियमन करीत असताना एक स्विफ्ट डिझायर कार नंबर एम एच १३ बी एन४८६८ वेगाने आल्याने तपास कामी या गाडीला थांबवण्यात आले सदरची गाडी न थांबता सरगम चौकाकडे निघून गेली. सदर गाडीचा पटला केला असता सदरची कार गाडी सरगम चौकातील वाहतुकीमुळे गाडी पुढे जाऊ शकली नाही. लागलीच सदर गाडीच्या चालकास विश्वासात घेऊन पळून का जात होता गाडीत काय आहे? त्यांनी गाडीमध्ये गांजाचे दोन पुढे असल्याचे सांगितले. तिचे नाव गाव विचारता असता त्यांनी आपले नाव माणिक साहेबराव चौगुले राहणार नारायण चिंचोली असे असल्याचे सांगितले. त्याच गाडी व मुद्देमाला सह ताब्यात घेऊन गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक नितीन जगताप व इतर पोलीस अंमलदार यांना माहिती दिल्याने सादरीकरण पोलीस अधिकारी पोलीस स्टाफ यांनी गाडी जवळ जाऊन आत पाहिले. कुब्रट, उद्रघान गांजाचा वास येत होता. विकी दोन शील बंद पाकीट मिळून आली. आरोपी व त्याच्या मालकीची पांढरी रंगाची शिफ्ट डिझाईर चार नंबर इमेज १३ बी एन ४८ ६८, ही पुढील कारवाईसाठी पोलीस ठाणे येथे आणून पंढरपूर शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल. रजिस्टर नंबर१६५/२०२६ एनडीपीएस कायदा कलम २० (बं) अन्वयी गुन्हा दाखल केला आहे

सदर आरोपीकडून खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. १) ७९, १२० रुपये प्रतिबंधक हिरवट तीन किलो ९५६ ग्रॅम वजनाचा प्रतिबंधित उग्र वास येणारा हिरव्या रंगाचा गांजा २)५,००,०००/रुपये किमतीची पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायर कार नंबर एम एच १३ बी एन ४८ ६८, एकूण पाच लाख ७९ हजार एकशे वीस एकूण मुद्देमाल आरोपीसह ताब्यात घेतला आहे.

सदरची कुलकणीय कामगारी मा. पोलीस अधीक्षक श्री अतुल कुलकर्णी सो. अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम कुमार यावलकर सो. उपविभागीय पोलिस अधिकारी पंढरपूर विभाग श्री प्रशांत डगळे सो. व पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री दशरथ वाघमोडे सो. यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी नितीन जगताप,सपोफौ. कल्याण ढवणे,पोहेको. प्रसाद आवटी, रवींद्र हंगे, पोलीस नाईक सचिन इंगळे, पोलीस कॉन्स्टेबल कपिल माने, बिचुकली हर्षद ठाकूर, दीपक नवले रोहित टोणपे, २१ ७१ गायकवाड यांनी केली आहे सदर गुन्ह्याचा पुढील अधिक तपास श्री दशरथ गायकवाड करीत आहेत.

# सोलापूर जिल्हा कबड्डी संघात वागदरीच्या विनय नंजुंडे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




अक्कलकोट /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील वागदरी गावाचा सुपूत्र व घाळीदास कबड्डी संघाचा खेळाडू विनय विलास नंजुंडे यांची महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या ७३ व्या वरिष्ठ पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा २०२६ साठी सोलापूर जिल्हा पुरुष कबड्डी संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा नाशिक जिल्ह्यातील सिन्नर येथे होणार आहे.

विनय नंजुंडे यांच्या या निवडीमुळे वागदरी गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशाबद्दल क्रीडाप्रेमी, ग्रामस्थ व मित्रपरिवाराकडून त्यांचे अभिनंदन करून आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.आगामी राज्यस्तरीय स्पर्धेत विनय नंजुंडे उत्कृष्ट कामगिरी करून सोलापूर जिल्ह्यासह आपल्या गावाचे नाव उज्ज्वल करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# खामसवाडी येथे माऊली वेलनेस अँड फिटनेस सेंटरचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



खामसवाडी प्रतिनिधी/हनुमंत पाटुळे : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे दि.२९ मार्च २०२६ रोजी माऊली वेलनेस अँड फिटनेस सेंटर चे उद्घाटन मा.श्री.विश्वास कोकणे (समाज कल्याण सभापती धाराशिव), पंचायत समिती सदस्या श्रीमती सुवर्णा दयानंद पाटील, गावचे सरपंच अमोल पाटील, उपसरपंच दयानंद पाटील, सोसायटीचे चेअरमन संजय पाटील, व्हाईस चेअरमन भगवान झोरी, जगदंबा माध्यमिक कन्या प्रशालेचे अध्यक्ष अशोक त्रिंबकराव शेळके, माजी उपसरपंच किरण बाबुराव पाटील, उद्योजक राजेंद्र गिरी, रणजीत देशमाने, सहशिक्षक अनंत बाबर, ज्योतीसिंग राठोड यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी वरिष्ठ २५०० गेट टिम जागतिक आरोग्य सल्लागार शिवराज गोपाळ घरे व गेट टिम जागतिक आरोग्य सल्लागार श्री रामदास घुले, विठ्ठल सागरे, दिनेश माने, गेट टिम आरोग्य सल्लागार शेख अन्वर, आरोग्य सल्लागार अरुण सावंत, यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी उपस्थितांना मान्यवरांनी मार्गदर्शन केले. तसेच आरोग्य विषयक माहिती देण्यात आली. यावेळी वजन वाढवणे, वजन कमी करणे, व्यायामाचे प्रकार, आहार, औषधी याबाबत माहिती देण्यात आली. या कार्यक्रमासाठी पत्रकार हनुमंत पाटुळे, गोपाळ शेळके, दीपक सावंत, सुनील पाटील, सुशील पाटील, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन सुनिता खंडू भालेकर व खंडु भालेकर यांनी केले होते.

# बार्टी संस्थेमार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी करिता आर्थिक सहाय्य देणेबाबत साठी आर्थिक सहाय्य योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे, मार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी करिता एक रक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या परीक्षेस पात्र असलेल्या महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी प्रती विद्यार्थी रक्कम रु १०,०००/ एक रक्कमी आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी आर्थिक सहाय्य देणेबाबत घोषित केले आहे. सदर निकालानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोग अराजपत्रित गट-ब पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना मुख्य परीक्षा तयारी करिता आर्थिक सहाय्य देणेबाबत. पात्र असलेल्या उमेदवारांना एक रक्कमी प्रती रक्कम रु. १०,०००/चे आर्थिक सहाय्य देण्यात येत आहे. त्याबाबत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन फॉर्म बार्टी संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी सदर योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन बार्टी संस्थे मार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी http://barti.maharashtra.gov.in > NOTICEBORD > Maharashtra Public Service Commission Non-Gazetted Group-B Main Examination 2025 येथे भेट द्यावी.

## रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे; वाहनधारकांची कसरत

# अक्कलकोट ते वागदरी हिरोळी कर्नाटक बॉर्डर पर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिरवळ/ हणमंत घोदे

अक्कलकोट ते वागदरी हिरोळी कर्नाटक बॉर्डर पर्यंतच्या रस्त्याची दुरवस्था अत्यंत दयनीय झाली असून हा रस्ता पूर्णपणे खचून गेला आहे. त्यामुळे वाहने चालविताना वाहनधारकांना कसरत करावे लागत आहे.

रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असून रस्त्यावर खड्डे आहेत की ✻खड्ड्यात रस्ता आहे असा प्रश्न वाहनधारकांना पडत आहे. अक्कलकोट ते वागदरी हा रस्ता कर्नाटक व मराठवाड्याला तसेच गुलबर्गा ते गाणगापूर, उमरगा ते हैदराबाद या महामार्गांना जोडणारा महत्त्वाचा रस्ता आहे.



शिरवळवाडी गावातील जगदंबा मंदिर समोरील भला मोठा खड्डा

या रस्त्यावरून मराठवाड्यातील हजारो स्वामी भक्त प्रवास करतात तसेच रस्त्यावरून दररोज हजारो जड वाहनांची ये-जा असते. तब्बल संपूर्ण २२ किलोमीटर रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून अनेक धोकादायक वळण आहेत. त्यामुळे मोठ्या अपघाताला निमंत्रण मिळत आहे. खड्डे चुकविताना अनेक लहान-मोठे अपघात झाले आहेत.

अतिशय रहदारीचा रस्ता मोठ्या व लहान वाहनांची वर्दळ असते. तेव्हा एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अक्कलकोट-गाणगापूर-तुळजापूर या तीर्थक्षेत्रांना जोडणारा अतिशय महत्त्वाचा रस्ता आहे. संपूर्ण रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडल्याने वाहन चालवताना कसरत करावी लागत आहे. संबंधित राष्ट्रीय महामार्ग अधिकारी व प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करत असून राष्ट्रीय महामार्ग अधिकारी लक्ष घालून रस्ता त्वरित दुरुस्त करून घ्यावा अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. या महामार्गावरून जड वाहतूक होत असून रस्त्यावरिल खड्ड्यामुळे मोठे अपघात होण्याचे शक्यता वर्तवण्यात येत आहे.

# सोलापुरात 'यश लॅक्मे सलून'चा भव्य शुभारंभ; सौंदर्य सेवांमध्ये नवा मानदंड



सोलापूर/नागेश श्रीचिप्पा : शहरातील उद्योजक सुयश खानापुरे आणि सोनाली खानापुरे यांनी रियल इस्टेट व बांधकाम क्षेत्रात यशस्वी वाटचाल केल्यानंतर आता सौंदर्य क्षेत्रात दमदार एंट्री घेत 'यश लॅक्मे सलून' हा अत्याधुनिक उपक्रम सुरू केला आहे. या सलूनचा भव्य शुभारंभ १ एप्रिल रोजी सोलापुरात होत असून, यामुळे शहराच्या सौंदर्यविश्वात एक नवा अध्याय सुरू होत आहे.

लॅक्मे सलून (डरज्ञा.डरश्रेप) हे देशातील अग्रगण्य व विश्वासार्ह ब्युटी ब्रँड म्हणून ओळखले जाते. ४० वर्षांहून अधिक अनुभव असलेल्या या साखळीने संपूर्ण भारतात आपली खास ओळख निर्माण केली आहे. हेअर कट, हेअर कलरिंग, स्किन केअर, फेशियल, ब्रायडल मेकअप तसेच आधुनिक ग्रूमिंग सेवा यासाठी लॅक्मे सलून प्रसिद्ध आहे.

'यश लॅक्मे सलून'मध्ये ग्राहकांना जागतिक दर्जाच्या सेवा देण्यासाठी प्रशिक्षित स्टायलिस्ट आणि ब्युटी एक्सपर्ट्स कार्यरत असणार आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान, उच्च दर्जाची स्वच्छता आणि सुरक्षिततेच्या निकषांचे काटेकोर पालन यामुळे ग्राहकांना दर्जेदार व विश्वासार्ह सेवा मिळणार आहे.

देशातील १२५ हून अधिक शहरांमध्ये ४०० पेक्षा जास्त शाखांद्वारे सेवा देणाऱ्या या प्रतिष्ठित ब्रँडची सुविधा आता सोलापूरकरांसाठी उपलब्ध होत आहे. या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांना महानगरांप्रमाणेच अत्याधुनिक सौंदर्य सेवा आपल्या शहरातच मिळणार असून, यामुळे सोलापूरच्या विकासाला आणखी एक नवे परिमाण मिळणार आहे.

सोलापूरकरांनी या अत्याधुनिक सलूनचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक सुयश खानापुरे व सोनाली खानापुरे यांच्या कडून करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस उद्योजक सुयेश खानापुरे, सोनाली, खानापुरे, उद्योजक मयूर दरगड, लॅक्मे समूहाचे आदित्य पेठकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.